**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक १३ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

1. **विदर्भ आणि मराठवाड्यातील सर्व १९ जिल्ह्यांत दुग्ध विकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबविण्याचा, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय.**
2. **राज्यातील निवडून आलेल्या नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्षे होणार -पूर्वलक्षी प्रभावाने होणार अंमलबजावणी.**
3. **राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंगच्या काल जाहीर झालेल्या क्रमवारीत विदर्भातील अनेक शैक्षणिक संस्थांचा समावेश.**
4. **केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय नागपूर, मनपा आणि महामेट्रोच्या वतीनं आयोजित 'स्वातंत्र्य दिन विशेष मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शनाला आजपासून सुरवात**

****

मंत्रिमंडळ निर्णय - दुग्ध विकास विदर्भ

पशुपालन आणि दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी विदर्भ आणि मराठवाड्यातील सर्व १९ जिल्ह्यात दुग्ध विकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. नागपूर इथं मदर डेअरीच्या माध्यमातून राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळामार्फत ५०० कोटी रूपये खर्चाचा दुग्ध प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहे. यामुळे विकासाला चालना मिळून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. आज झालेल्या राज्य मंत्रीमंडळ बैठकीत या प्रकल्पासाठी १४९.२६ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांना दिली.या प्रकल्पात उच्च दुध उत्पादन क्षमता असलेल्या गायी-म्हशींचे वाटप, गायी म्हशीं मधील वंध्यत्व निवारण कार्यक्रम, उच्च दुध उत्पादन क्षमता असलेल्या भृणांचे प्रत्यारोपण केलेल्या कालवडींचे वाटप, पशुप्रजनन पुरक खाद्याचा पुरवठा, चारा-पिके घेण्यासाठी अनुदान, विद्यूत चलित कडबाकुट्टी सयंत्रांचे वाटप, आणि आधुनिक पद्धतीने दुग्ध व्यवसाय करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण अशा एकुण ९ घटकांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी तीन वर्षाच्या कालावधीसाठी १४९.२६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

मंत्रिमंडळ निर्णय - अन्य / नगराध्यक्ष

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणखी काही महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यात, राज्यातील ३९० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. हे प्रकल्प यवतमाळ, वाशिम तसेच चंद्रपूर जिल्ह्यात उभारण्यात येत आहेत.राज्यातील निवडून आलेल्या नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्षे करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येतील. राज्यातील नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२१-२२ मध्ये झाल्या असून त्याचा कालावधी अडीच वर्षांचा आहे. तो आता संपत असल्यामुळे हा कालावधी पाच वर्षाचा करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येईल. याशिवाय शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अध्यापकांना ठोक मानधन देण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. सुधारित हायब्रिड ॲन्युईटी योजनेत राज्यातील सहा हजार किमी रस्ते डांबरीकरण करण्यात येणार होते मात्र त्याऐवजी या रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यासाठी आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सुधारित ३६ हजार ९६४ कोटी खर्चास मान्यता देण्यात आली. तर यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट शिथील करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.

अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी-

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अहिल्याबाई होळकर यांना त्यांच्या पुण्यतिथी निमित्त आदरांजली वाहिली. अहिल्याबाई होळकर यांनी देशभरातल्या तीर्थक्षेत्रांचा जीर्णोद्धार करून आणि मंदिरे बांधून सनातन संस्कृतीच्या संवर्धनात अतुलनीय योगदान दिलं, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही ट्विट संदेशाच्या माध्यमातून अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन केलं. देशातील पहिले आंतरराष्ट्रीय दर्जाचे ‘अहिल्या भवन’ मुंबईत उभारणार असल्याची घोषणा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आज केली.जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून मानखुर्द येथे अहिल्या भवन उभारले जाईल. ३५ हजार ५०० चौरस मीटर इतक्या परिसरात हे भवन उभारले जाणार असून त्यासाठी ४७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याचं मंत्री लोढा यांनी सांगितल. या संकुलाच्या दर्शनी भागात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा पूर्णकृती पुतळा दर्शनी भाग उभारण्यात येईल. तसंच महिलांच्या योजनांसंदर्भात विविध विभाग एकाच छताखाली आणले जातील.

माहिती नियमन विधेयक २०२४- मसुदा

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं प्रसारण सेवा नियमन विधेयक २०२४ च्या मसुद्यावर अभिप्राय आणि सूचना देण्याची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे, यावर विचारविनिमय करून कायद्याचा नवा मसुदा तयार केला जाईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं म्हटलं आहेविधेयकाच्या मसुद्यावर विविध संघटनांकडून अनेक शिफारशी ., अभिप्राय आणि सूचना प्राप्त झाल्या आहेत, असही मंत्रालयानं म्हटलं आहे.

डॉक्टर संप/नागपूर

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात महिला निवासी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा निषेध नोंदवण्यासाठी देशभरातल्या निवासी डॉक्टरांनी संप पुकारला आहे. फोर्डा या निवासी डॉक्टर संघटनेच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. राज्यात विविध सार्वजनिक रुग्णालयांतल्या निवासी डॉक्टरांनी आज काम बंद आंदोलन सुरू केलं. निवासी डॉक्टरांची राज्य संघटना - मार्डच्यावतीनं, या प्रकरणाची केंद्रीय तपास यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे. नागपूरातही  निवासी डॉक्टर संघटना मार्डने आजपासून बेमुदत संप पुकारला आहे. सकाळीं 9 वाजेपासून निवासी डॉक्टरांनी शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, डागा आणि मेयो रुग्णालयाचा मुख्य प्रवेशद्वारावर घोषणा देत या  घटनेचा निषेध नोंदविला. दरम्यान शासकीय रूग्णालयातील आपत्कालीन रुग्णसेवा तसेच ओपीडी सूरू ठेवण्यात आली आहे.मात्र निवासी डॉक्टर बेमुदत संपावर गेल्यानं रुग्णसेवा काही प्रमाणात विस्कळित झाली आहे. याशिवाय नागपुर शहर आणि ग्रामीण भागात असलेले प्राथमिक आणि नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू आहे.

हर घर तिरंगा /रवींद्र शोभणे

हरघर तिरंगा’ मोहिमेअंतर्गत आजपासून आपापल्या घरावर तिरंगा फडकवून स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवात सहभागी होण्याचं आवाहन सरकारनं केलं आहे. या मोहिमेअंतर्गत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नवी दिल्लीत भारत मंडपम इथून तिरंगा बाईक रॅलीला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. या बाईक रॅलीमध्ये लोकसभा आणि राज्यसभेतले खासदार सहभागी झाले होते. ‘हर घर तिरंगा’ अभियानाच्या अनुषंगानं  आज नागपुरात  सकाळी ६ वाजता “तिरंगा मॅरेथॉन”चं  आयोजन करण्यात आलं . नागरिकांनी मोठ्या संख्येनी या मॅरेथॉन मध्ये  सहभाग नोंदवला. तत्पूर्वी काल मनपा तर्फे  'एक शाम शहीदो के नाम' या कार्यक्रमाचं  आयोजन करण्यात आलं होतं . कार्यक्रमामध्ये १०० कलावंतांनी विशेष सहभाग नोंदविला.

97व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनीं 'हर घर तिरंगा' अभियान यशस्वी करण्यासाठी केलेलं  आवाहन आता ऐकुया-

***नमस्कार मी रविंद्र शोभणे .15 ऑगस्ट 1947 रोजी आपला भारत देश स्वातंत्र झाला आणि त्या स्वातंत्र्याच्या आनंद त्या स्वातंत्र्याच्या जल्लोष दरवर्षी 15 ऑगस्ट रोजी साजरा करीत असतो हा आनंद साजरा करण्याकरिता आपल्या घरावर तिरंगा लावावा आणि आपला हा स्वातंत्र्य दिनाचा आनंद आहे जो जल्लोश आहे तो अधिक मोठ्या प्रमाणात साजरा करावा अशी माझी आपणा सर्वांना विनंती आहे.***

संस्थात्मक रँकिंग

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या वतीनं उच्च शैक्षणिक संस्थांची या वर्षीची  राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग आज जाहिर करण्यात आली. यामध्ये पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाला, सर्वोत्कृष्ट विद्यापीठांमध्ये तिसरा क्रमांक मिळाला आहे. देशातल्या 100 सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या रँकिंगमध्ये महाराष्ट्रातील 10 विद्यापीठांचा समावेश आहे. यात दत्ता मेघे उच्च शिक्षण आणि संशोधन संस्था, वर्धा 42 व्या स्थानावर आहे. समग्र संस्थांच्या श्रेणीमध्ये निवडलेल्या देशातील 100 शैक्षणिक संस्थांमध्ये महाराष्ट्रातील 11 शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे. यात विदर्भातील  दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रीसर्च, वर्धा 71व्या स्थानावर  तर  विश्वेश्वरैया राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर 77 व्या स्थानावर आहे. अभियांत्रिकी शिक्षण संस्थेच्या रँकिंग मध्ये देशातील 100 अभियांत्रिकी संस्थांमध्ये महाराष्ट्रातील पाच संस्थांचा समावेश आहे. यात विश्वेश्वरैया राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, नागपूर (39)एकोणचाळीस व्या स्थानावर आहे. महाविद्यालयांच्या रँकिंग मध्ये विदर्भातील  सरकारी विज्ञान संस्था, नागपूर 64 व्या क्रमांकावर, तर श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती  99 व्या क्रमांकावर आहे. देशातील 100  उत्कृष्ट व्यवस्थापन संस्थांमध्ये महाराष्ट्रातील नऊ  संस्थांचा समावेश आहे. यामध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट नागपूर 31 व्या स्थानी आहे. संस्थांमध्ये महाराष्ट्रातील 16  संस्थांचा समावेश आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर 51 व्या स्थानी  तर  श्रीमती. किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसी नागपूर 61 व्या स्थानी आहे.

मल्टिमीडिया छायाचित प्रदर्शनी

सूचना आणि  प्रसारण मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय नागपूर, तसंच  महानगर पालिका आणि महामेट्रोच्या वतीने आझादी का अमृत महोत्सव, विभाजन विभिषिका आणि  हर घर तिरंगा अभियानांतर्गत  नागपुरातील सीताबर्डी मेट्रो स्टेशन

इथं मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं असून आज आयुक्त आणि प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांच्या हस्ते फीत कापून उदघाटन करण्यात आलं. यावेळेला मान्यवरांनी प्रदर्शनीची पाहणी देखील केली. पालिका शाळेचे विद्यार्थी महापुरुषांच्या वेशभूषा धारण करून या कार्यक्रमात सहभागी झाले होते. १३ ते १५ ऑगस्ट असे तीन दिवस हे प्रदर्शन नागरिकांना पाहण्यासाठी खुले राहणार आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील सन 1857 ते 1947 या कालखंडातील घडलेल्या महत्वपूर्ण घटना, ऐतिहासिक स्थळं, ज्ञात आणि अज्ञात क्रांतिकारक आणि राष्ट्रपुरुषांची माहिती देणाऱ्या दुर्मिळ छायाचित्रांचे मल्टीमिडीया छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन उद्या बुधवारी सकाळी 11 वाजता वर्धा जिल्हा क्रिडा संकुल इथं होणार आहे.

गाड्या रद्द

नागपूर विभागातील चांदूर रेल्वे आणि भुसावळ विभागातील वाघळी स्थानकावर नॉन ‘ कार्यामुळे अनेक गाड्यांच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत ’इंटरलॉकिंग, तर काही गाड्यांच्या वेळेत बदल आहे. प्रवाश्यांनी गाड्यांबद्दल माहिती काढून मगच प्रवास योजना आखावी आणि रेल्वेला सहकार्य करावं असं आवाहन करण्यात आलं आहे

**कृषी विद्यापीठ**

जागतिक हवामान बदलाच्या कालखंडात देशांतर्गत कृषि विद्यापीठांकडून व्यावसायिक शेती पद्धतीत सुसंगत निरंतर संशोधन होत असून तंत्रज्ञानाचा वापर या संशोधनाचा जलद गतीने प्रचार प्रसार होण्यासाठी करण्यात येत आहे. आता एका शेतकऱ्यांकडून दुसऱ्या शेतकऱ्याकडे समांतर तंत्रज्ञान प्रसाराची आवश्यकता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांनी प्रतिपादित केली. सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला तथा नेटवर्क ऑफ आशिया अँड पॅसिफिक प्रोडूसर्स, फेअरट्रेड यांच्या संयुक्त माध्यमातून आयोजित "कापूस उत्पादनासाठी उत्कृष्ट व्यवस्थापन पद्धती" विषयावर तीन दिवसीय राष्ट्रीय प्रशिक्षण वर्गाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

हवामान

विदर्भातील अमरावती, वर्धा, अकोला, बुलढाणा आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये आज तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दरम्यान उद्या आणि परवा संपूर्ण विदर्भात हवामान सामान्य राहण्याचा अंदाज आहे.

*****